# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
email:- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./३५७६/२०२६ दि. २८/१०/२०२६

## अधिसूचना

संदर्भ :- 1. विद्यापीठाची दीक्षांत समारंभाची अधिसूचना जाक्र आस्था./3144, दि. 19/09/2026.
2. विद्यापीठाची अधिसूचना जाक्र आस्था./3454, दि. 06/10/2026.
3. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई यांचे पत्र दि. 23/10/2026.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, दि. 12 ऑक्टोबर, 2026 रोजी नियोजित असलेला गोंडवाना विद्यापीठाचा चौदावा दीक्षांत समारंभ पुढे ढकलण्यात आल्याबाबत संदर्भ क्र. 2 अन्वये सूचित करण्यात आले आहे.

मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई यांचे संदर्भ क्र. 3 अन्वये दि. 23/10/2026 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाचा चौदावा दीक्षांत समारंभ रविवार, दि. 15 नोव्हेंबर, 2026 रोजी सकाळी 11.30 वाजता गोंडवाना विद्यापीठाचे नविन सांस्कृतिक सभागृह येथे संपन्न होणार आहे. या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान मा. श्री. जिष्णू देव वर्मा, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा मा. कुलपती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अथवा त्यांचे अनुपस्थितीत डॉ. प्रशान्त बोकारे, मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे भुषवणार असून प्रमुख प्राहुणे म्हणून श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच या समारंभात गोंडवाना विद्यापीठाचे मा. कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे व मा. प्र-कुलगुरु, डॉ. श्रीराम कावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदर समारंभामध्ये मा. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, विशेष अतिथी, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद यांचे सन्माननिय सदस्य आणि विद्यापीठातील विविध प्राधिकरणाचे/मंडळाचे/समित्यांचे सदस्य यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या समारंभात विशेष गुणवत्ता प्राप्त, प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना सुवर्ण पदक, आचार्य पदवी व पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी दीक्षांत समारंभाकरीता रविवार, दि. 15 नोव्हेंबर, 2026 रोजी सकाळी 11.30 वाजता गोंडवाना विद्यापीठाचे नविन सांस्कृतिक सभागृह येथे उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

**मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग मुंबई.
३. मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग पुणे.
४. मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
५. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली.
६. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
८. सर्व प्राधिकरणांचे सन्माननीय सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
९. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१०. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसूचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
११. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सूचित करण्यात येते की, सदर अधिसूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
१२. आस्थापना व प्रशासन विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner